# 'विश्वकर्मा'तर्फे प्रात्यक्षिक उपक्रम

**पुणे :** विश्वकर्मा खासगी विद्यापीठ आणि कोल्हापूरस्थित हस्तकला सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (ता. १८) ते बुधवार (ता. २०) या कालावधीत हस्तकला प्रात्यक्षिक आणि जागरूकता उपक्रमाचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये हस्तकलेविषयी जागरूकता आणि प्रसार व्हावा, यासाठी हा उपक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या आर्ट आणि डिझाईन विभागाचे अधिष्ठाता प्रा. निशांत कंबोज यांनी दिली. तरुणपिढीला हस्तकलेचे महत्त्व कळावे, या अनुषंगाने विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.